महाराष्ट्र टाइम्स

# निर्णयक्षम व्यवस्थापक व्हा : गडकरी

Maharashtra Times | Apr 15, 2017, 04.00 AM IST



म.टा.विशेष प्रतिनिधी, नागपूर

'प्रशासकीय अधिकाऱ्यांचे त्यांच्या पत्नीपेक्षा फाइलवर अधिक प्रेम आहे. त्यामुळे अनेकदा ते फाइलवर निर्णयच घेत नाहीत. परंतु, देशाचा जलदगतीने विकास करायचा असेल तर निर्णयक्षम अधिकारी हवे आहेत. तेव्हा निर्णय घेणारे अधिकारी व व्यवस्थापक व्हा', असा सल्ला केंद्रीय परिवहनमंत्री नितीन गडकरी यांनी शुक्रवारी येथे विद्यार्थ्यांना दिला.

इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट नागपूरचा पहिला दीक्षांत समारंभ विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या (व्हीएनआयटी) सभागृहात झाला. त्यावेळी गडकरी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. समारंभाला आयआयएम नागपूरच्या सोसायटीचे अध्यक्ष व टेक महिंद्राचे संचालक सी. पी. गुरनानी, आयआयएमचे संचालक प्रो. एल. एस. मूर्ती आणि आयआयएम अहमदाबादचे संचालक प्रो. आशिष नंदा प्रामुख्याने उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, 'नागपुरातील विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळावे, या उद्देशाने आयआयएमची स्थापना करण्यात आली. आयआयएमला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता मिहानमध्ये जागा दिली आहे, तर केंद्र सरकारच्या मदतीने जगातील सर्वोत्तम संस्था म्हणून विकसित करण्याचे प्रयत्न होणार आहेत. नागपूर भविष्यात एज्युकेशन हब व्हावे, असे प्रयत्न सुरू आहेत. विदर्भातील मुले उच्चशिक्षणासाठी पुणे, मुंबई, बेंगळुरू व इतर प्रमुख शहरांत जातात. परंतु, त्यांना येथेच उच्चशिक्षण मिळावे त्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत, असेही गडकरी यांनी नमूद केले.

आयआयएमची पदवी घेतल्यानंतर सर्वोत्तम कंपन्यांमध्ये नोकरी मिळावी, त्यासाठी संस्था प्रयत्न करणार आहे. परंतु, विद्यार्थ्यांनी नोकरी मागण्याऐवजी नोकरी देणारे व्हावे. स्वतःचा व्यवसाय तयार करून देशाच्या व सामाजाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन गडकरींनी विद्यार्थ्यांना केले.

यावेळी सुमित मिश्रा या विद्यार्थ्याला आयआयएम नागपूरचे पहिले सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. तर धृव सूचक याला सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून गडकरींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

गुणवंत विद्यार्थी म्हणतात...

संस्था आता स्थिरावली

आयआयएम नागपूरच्या पहिल्या बॅचचा विद्यार्थी होण्याचा आणि पहिले सुवर्णपदक मिळाल्याचा अत्यंत आनंद होतो आहे. नवीन संस्था असल्याने सुरुवातीच्या काळात अनेक अडचणींचा सामना करावा लागला. परंतु, आता संस्था दोनच वर्षांत स्थिरावली आहे. देशातील सर्वोत्तम आयआयएम होण्याची क्षमता नागपूरच्या संस्थेत आहे. पायाभूत सुविधांच्या विकासक्षेत्रात काम करण्याची इच्छा आहे. त्याकरिता शहरातील विकासकामांचा ग्रामीण भागातील स्थलांतरणावर काय परिणाम होतो, त्यावर अभ्यास करायचा आहे.

-सुमित मिश्रा, सुवर्णपदक विजेता

आपलेपणा वाटला

काही वर्षे व्यावसायिक अनुभव घेतल्यानंतर संशोधनावर भर द्यायचा आहे. तसेच शैक्षणिक क्षेत्रातच योगदान देण्याचे उद्दिष्ट निर्धारित केलेले आहे. गेल्या दोन वर्षांत आयआयएम नागपूरच्या कल्चर आणि मार्केटिंग क्लबचे व्यवस्थापन हाताळाले. येथील अनुभव बरेच काही शिकविणारा ठरला आहे. अहदाबाद येथील असूनही नागपुरात शिकण्यासाठी आलो, पण येथे कधीही परकेपणाची भावना आली नाही.

-धृव सूचक, ऑल राऊंडर विद्यार्थी

गडकरींनी टाळले नंदांचे नाव

आयआयएम नागपूरच्या उद्घाटन समारंभाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना आमंत्रित न करण्यावरून आयआयएम अहमदाबादचे संचालक आशिष नंदा वादग्रस्त ठरले होते. गडकरींनीही त्यावर उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. आता दीक्षांत समारंभात बोलताना गडकरींनी प्रो. आशिष नंदा यांचा नामोल्लेखच टाळला. त्यामुळे नंदा यांच्यावरील नाराजी अद्यापही कमी झालेली नसल्याचे संकेतच गडकरी यांनी दिले.

व्हीएनआयटीच्या सभागृहावर आश्चर्य!

'देशातील नामवंत इंजिनीअरिंग संस्थेचे सभागृह पाहून मला आश्चर्य वाटते', असे बोलून नितीन गडकरी यांनी व्हीएनआयटीच्या वर्मावर बोट ठेवले. 'मी इंजिनीअरिंग तज्ज्ञ नाही, पण हे सभागृह बघितल्यापासून त्यातील बांधकामाच्या चुकाच दिसत आहेत. देशातील सर्वोत्तम इंजिनीअरिंग संस्थेत अद्ययावत सभागृह असू नये, त्याचे आश्चर्य वाटते', असे मत व्यक्त करून गडकरींनी व्हीएनआयटीला चिमटा काढला.